MHKO070013312019

नियमीत दिवाणी दावा क्रं.११३/२०१९ मधील नि.क्रं.१२ वरील आदेश.

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीतर्फे दाखल करणेत आलेला असून त्याव्दारे त्यांचे विरुध्द झालेला " विना कैफियत" चा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांनी दाव्याचे कामी 'कैफियत' हजर करण्यास परवानगी मिळण्याबाबत करण्यात आलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांच्याकडून काही महत्वाची कागदपत्रे ही उपलब्ध झाल्याने दावेची कैफियत व नि.५ चे अर्जास म्हणणे देण्यास विलंब झालेला असल्याने प्रतिवादीविरुध्द "विना कैफियत" चा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांची प्रस्तुत दाव्याकामी कैफियत व म्हणणे दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट कैफियत दाखल करुन घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी यांचे विरुध्द झाले "विना कैफियती" झाला आदेश रद्द करुन प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांच्या अर्जातील मजकूर खोटा व बनावट असल्याचे कथन करुन असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे त्याचे विना कैफियतीचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांच्या अर्जातील कारणे ही संयुक्तीक नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अगर मे. न्यायालय अर्ज मंजुर करणेच्या निर्णयाप्रत आल्यास प्रतिवादी यांना रक्कम रु.२०००/- दंड करणेत यावा अशी विनंती केली.

४. उभय पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुतकामी प्रतिवादी यांना दावेचे समन्स (नि.क्रं.६) लागू होवून विधिज्ञामार्फत दि.०८/०८/२०१८ रोजी हजर होवूनही मुदतीत प्रस्तुत दाव्यास आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी त्यांना कैफियत बनविणेकामी आवश्यक असलेली कागदपत्रे ही मुदतीत उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांना

दाव्याकामी कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे कथन केलेले आहे. तसेच प्रतिवादी यांनी त्याच्या अर्जामधील कथने ही शपथेवर सांगितलेली आहेत. एकंदरित कागदपत्रावरुन प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब हा जरी संयुक्तीक वाटत असला तरी कैफितय दाखल करण्यास झालेल्या विलंबामुळे विरुध्द पक्षकारांची गैरसोय झालेली आहे. परंतु प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्याची संधी दिल्यास नैसर्गिक न्यायतत्वाने प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होणार आहे. न्यायालयीन कार्यपध्दतीचे कायदे हे न्यायाच्या हेतूस्तव बनविण्यात आलेले असतात. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीस झालेली गैरसोय ही खर्चाच्या माध्यमातून भरुन काढता येण्यासारखी आहे. वरील नमूद सर्व कारणांचा तसेच विलंब कालावधीचा विचार करता खर्च देण्याच्या अटींवर अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>आ दे श</u>

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी वादीना र.₹५००/- अर्जाचा खर्च म्हणुन देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. खर्चाची रक्कम अदा केलेनंतर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2019.11.18 03:22:19 +0530

दिनांक – १६.११.२०१९

(व्ही.पी.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर